दाखल दिनांक : १०.०६.२०१५

नोंदणी दिनांक : ११.०६.२०१५

निकाल दिनांक: २९.०५.२०२६

| कालावधी : | वर्षे | महिना | दिवस |
|---|---|---|---|
| | १० | ११ | १९ |

**MHSO110021292015**

| | |
|---|---|
| | **माळशिरस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**<br>**ता. माळशिरस, जि. सोलापूर**<br>**(पिठासीन अधिकारी – यु. बी. पेठे)**<br>**न्यायनिर्णय**<br>**(घोषित दिनांक – २९/०५/२०२६)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र. ३४५/२०१५, नि.क्र. ३७**<br>**गु.र.नं. ३९/२०१४ पोलीस ठाणे माळशिरस, ता.माळशिरस** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. अभियोक्ता | श्री. पी. एस. कश्यप. |
| आरोपी | १. तात्या महादेव कोळेकर<br>वय – ४७ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. तिरवंडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर. |
| आरोपी तर्फे विधिज्ञ | श्रीमती एस. डी. वाघमोडे. |

## भाग – ब

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १९.०३.२०१४ |
| पहिली खबर दिनांक | १९.०३.२०१४ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | १०.०६.२०१५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २९.११.२०१८ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २०.०२.२०१९ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २९.०५.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | तात्या महादेव कोळेकर | १९.०३.२०१४ | २०.०३.२०१४ | भादवि ३७९, सह कलम ३४ | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पर्यावरण का. कलम ९ व १५, भा. गौण खनिज का. कलम २१(४) | | | |

**भाग – क**

**अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | विठ्ठल शंकर कुंभार | पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ | यशवंत सोमण्णा आनंदपुरे | फिर्यादी |
| अ.सा.क्र.३ | दत्तात्रय रघुनाथ जगताप | साक्षीदार . |
| अ.सा.क्र.४ | नवनाथ शरद सावंत | साक्षीदार. |
| अ.सा.क्र. ५ | अस्लम अकबर काझी | तपासीअधिकारी. |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निंरक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/ बचाव /कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | १६ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीपुरत्या भागाला. |
| २. | २९ व ३० | रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३. | ३२ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | ३३ | जप्ती पंचनामा |

**ब.बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क.कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड.मुद्देमाल**

| **अ.क्र** | **मुद्देमाल क्र** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | एम. आर. क्र. १०/२०१४ | ट्रॅक्टर क्र. एम. एच ४५ एफ. ५८९९, ट्रॉली क्र. एम. एच. ४५ ई. ४९३४ व ट्रॉली क्र. एम. एच. ४५ ई. ४९३५. |

## न्यायनिर्णय

### (दिनांक २९ मे, २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत खटला आरोपींविरूध्द त्यांनी भारतीय दंड विधान, १८६० (या पुढे भा.दं.वि. म्हणून नमूद केलेले) चे कलम ३७९, पर्यावरण कायदा कलम ९ व १५, भारतीय गौण खनिज कायदा कलम २१(४) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केलेबाबत दाखल करणेत आला आहे.

### अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे:-

(२) यशवंत सोमण्णा आनंदपुरे (यानंतर थोडक्यात खबरी असे नमुद) हे पोलीस स्टेशन माळशिरस येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असताना दिनांक १९.०३.२०१४ रोजी दुपारी ०१.०० वाजताच्या सुमारास ते इतर पोलीस कर्मचा-यांसोबत मौजे मेडद येथे पेट्रोलिंग करीत असताना चाकोरे गावाजवळील पुलाजवळ आले. तेव्हा त्यांना समोरून चाकोरे गावाकडून वाळुने भरलेली दोन ट्रेलर ट्रॅक्टरसह येताना

दिसले. खबरी व इतर कर्मचारी ट्रॅक्टरजवळ येत असताना ट्रॅक्टरचा चालक पोलीसांची गाडी दिसताच त्याचे वाहन जागेवर थांबवून जवळचे ऊसात पळून गेला. सदर ट्रॅक्टरचा क्रमांक एम. एच. ४५ एफ. ५८९९ व ट्रॉली चे क्रमांक एम. एच. ४५ ई. ४९३४ व एम. एच. ४५ ई. ४९३५ असे होते. प्रत्येक ट्रेलरमध्ये अंदाजे दीड ब्रास वाळु भरलेली होती. खबरीने वाहन चालक व मालकाबाबत आजूबाजू चौकशी केली असता आरोपी ट्रॅक्टर चालक व मालक असल्याचे समजले. त्यामुळे खबरीने आरोपीविरूध्द पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट दिला.

(३) खबरीचे वर्दीवरून आरोपींविरूध्द माळशिरस पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ३९/२०१४, भा.दं.वि कलम ३७९ सह कलम ३४, पर्यावरण कायदा कलम ९ व १५, भारतीय गौण खनिज कायदा कलम २१(४) अन्वये दाखल करणेत आला. प्रस्तुत गुन्हयाचा सपोफौ एम. बी. जमादार यांनी केले. त्यांनी तपासकामी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. घटनेसंबंधीत साक्षीदारांकडे चौकशी करून, त्यांची तपास टिपणे नोंदविली. त्यांनी केलेल्या एकंदर तपासामध्ये आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांचेविरूध्द भा.दं.वि कलम ३७९ सह कलम ३४, पर्यावरण कायदा कलम ९ व १५, भारतीय गौण खनिज कायदा कलम २१(४) अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

(४) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरूध्द नि.क्र. १२ येथे भा.दं.वि, कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवला. सदरचा दोषारोप आरोपींना मराठी भाषेत वाचून, समजावून सांगितला असता, त्यांनी दोषारोप (नि.क्र. १३) नाकबूल करून खटला पुढे चालविणेची विनंती केली. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा मिळून आल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१) अन्वये आरोपींचे निवेदन (निशाणी क्र.३६ ) प्रमाणे नोंदविण्यात आले.

(५) दोन्ही पक्षांचे म्हणणे व पुरावा यावरून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष पुढे दिलेल्या सविस्तर कारणांसाठी खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. १९.०३२०१४ रोजी रात्री १३.०० वाजताच्या सुमारास मौजे चाकोरे, ता. माळशिरस येथील चाकोरे नदीपात्रातून शासनाच्या मालकीची वाळू रॉयल्टी न भरता लबाडीने मालट्रकमधून चोरी केलेली वाळू वाहतुक करुन घेऊन जाताना मिळून आले, असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय? | **नाही.** |
| २. | आरोपींना कोणत्या अपराधाबाबत सिध्ददोषी ठरविता येईल ? | **कोणत्याही नाही.** |
| ३. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ व २ करिता :**

(६) सदरील मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने आणि अभियोग पक्षाने त्यावर सादर केलेला पुरावा संयुक्त असल्याकारणाने, सदरील सर्व मुद्दे एकत्रितरित्या विवेचनासाठी घेतलेले आहेत. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणात आलेल्या साक्षीपुराव्यांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्यात अभियोगपक्षाने असे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने अनधिकृतपणे शासनाच्या मालकीची वाळू रॉयल्टी न भरता लबाडीने ट्रक्टरमधून चोरी केली व सदरची वाळू वाहतुक करुन घेऊन जाताना मिळून आला.

(७) अभियोगपक्षातर्फे खबरीची साक्ष (निशाणी २८) प्रमाणे नोंदविण्यात आली. घटनेच्या वेळी दत्तात्रय जगताप (अ.सा.क्र.३) नवनाथ सावंत (अ.सा.क्र.४) हे सुध्दा पोलीस स्टेशन माळशिरस येथे अनुक्रमे साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक व पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होते व पेट्रोलिंग करिता खबरीसोबत होते. त्यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, घटनेच्या वेळी ते मेडद बीटमध्ये पेट्रोलिंग करीत असताना दुपारी एक वाजता चाकोरे गावाजवळील पुलाजवळ आले असताना त्यांना समोरून एक ट्रॅक्टर दोन ट्रेलर घेवून येताना दिसला. त्यातील चालक आरोपी होता त्याला पोलीसांची गाडी दिसल्यानंतर तो ट्रॅक्टर उभा करून पळून गेला. त्या ट्रॅक्टरमध्ये प्रत्येकी दीड ब्रास वाळु होती.

(८) तपासअधिकारी असलम काझी (अ.सा.क्र.५) घटनेच्या वेळी माळशिरस पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होते. खबरी यांनी आरोपीविरूध्द पहिली खबर (नि.क्र. २९ प्रमाणे) दिल्यानंतर त्यांनी आरोपीविरूध्द गुन्हा क्र. ३९/२०१४ (नि.क्र.३० प्रमाणे) दाखल केला. त्यानंतर त्यांनी सदर प्रकरणाचा तपास केला. घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.३२ प्रमाणे) तयार केला. ट्रॅक्टर व दोन ट्रॉली जप्त करून जप्ती पंचनामा (नि.क्र. ३३ प्रमाणे) तयार केला.

(९) विठ्ठल कुंभार (अ.सा.क्र.) घटनास्थळपंचनाम्यावरील पंच असून त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही.

(१०) अभियोग पक्षाच्या वरील साक्षीदारांच्या पुराव्यावरून असे स्पष्ट होते की, सदर प्रकरणात आरोपीला वाळुची वाहतुक करताना पकडण्यात आले नाही. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटनेच्या वेळी पोलिसांचे वाहन पाहून जप्त ट्रॅक्टर वरील चालक पळून गेला होता. खबरीने साक्षीमध्ये सांगितले की, सदर ट्रॅक्टर चालकाची व मालकाची चौकशी केली असता आरोपी हा त्या ट्रॅक्टरवरील चालक व मालक असल्याचे समजले. परंतु जप्त ट्रॅक्टरवरील चालक व मालक आरोपी असल्याबाबतचा कोणताही प्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर नाही. एवढेच नव्हे तर जप्त ट्रॅक्टर आरोपीच्या मालकीचा असल्याबाबतचा पुरावा देखील अभिलेखावर नाही. एकंदरीत आरोपीचा सदर घटनेशी असलेला संबंध

जोडण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला. त्यामुळे घटनेच्या वेळी आरोपीने विनापरवाना अवैधपणे वाळुची वाहतुक केली हे ठोस सातत्यपूर्ण पुराव्यानिशी सिध्द होत नाही. करिता मुद्दे क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहे.

**मुद्दा क्र. ३ करिता:-**

(११) मुद्दे क्र. १ व २ च्या नकारार्थी निष्कर्षाने हे स्पष्ट होते की, आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द झाला नाही म्हणून आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल ०३ ब्रास वाळूच्या विल्हेवाटीबाबत यापूर्वी आदेश झालेला नसल्यास सदर जप्त मुद्देमाल जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या ताब्यात देण्यात यावे. त्यामुळे मुद्दा क्र.३ करिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) आरोपी तात्या महादेव कोळेकर यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७१) नुसार भारतीय दंड विधान कलम ३७९ सह कलम ३४ अन्वयेच्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणेत येते.

२) आरोपींचे वैयक्तीक जात मुचलके व जामीनकीचे बंधपत्रे रद्द करणेत येतात.

३) जप्त मुद्देमाल ट्रॅक्टर क्र. एम. एच ४५ एफ. ५८९९, ट्रॉली क्र. एम. एच. ४५ ई. ४९३४ व ट्रॉली क्र. एम. एच. ४५ ई. ४९३५ यापूर्वीच न्यायालयाच्या

आदेशाने परत दिलेली असल्याने त्याबाबत कोणताही आदेश नाही.

५) प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल ०३ ब्रास वाळूच्या विल्हेवाटीबाबत यापूर्वी कोणताही आदेश झालेला नसल्यास सदर जप्त मुद्देमाल हे अपिल कालावधीनंतर जिल्हाधिकारी सोलापुर यांचेकडे पाठविणेत यावे.

६) फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ ) नुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा जातमुचलका व जामीन कदबा देण्याबाबत आरोपींना निर्देशित करण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करणेत आला.)

Digitally signed by UMESH PETHE
Date: 2026.05.29 18:11:04 +0530

(यु. बी. पेठे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस,
ता. माळशिरस, जि.सोलापूर

स्थळ : माळशिरस
दिनांक : २९.०५.२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | M. P. Gheradi. |
| (b) | Name of the Court | : | Jt. C.J.J.D & J.M.F.C<br>Malshiras, Dist - Solapur |
| (c) | Order signed by P.O. On | : | 29.05.2026 |
| (d) | Order uploaded on | : | 29.05.2026 |